दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

• वर्ष १७ वे • अंक ४९ • MAHMAR/2006/17212 • रायगड • शुक्रवार दि.२० मे २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# चरई आदिवासी वाडी येथे भिंत कोसळून ८ वर्षांची मुलगी ठार ; ३ जखमी



**दै.रायगड नगरी । तळा**

तळा तालुक्यातील चरई आदिवासी वाडी येथे भिंत कोसळून आठ वर्षाची मुलगी मृत पावली असून तीन जण जखमी झाल्याची घटना घडली आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की चरई आदिवासी वाडी येथे रहात असलेल्या सुनिता अशोक मुकणे या आपल्या चार मुलांसह घरी झोपल्या असता सकाळी ४.१५ च्या सुमारास मोठा आवाज झाल्याने त्या जाग्या झाल्या असता घराच्या मागच्या बाजूची भिंत कोसळून त्याखाली सुवर्णा मुकणे, संतोष मुकणे, तन्वी मुकणे, तुषार मुकणे, ही आपली मुले ढिगाऱ्याखाली अडकल्याचे त्यांनी पाहिले. व तात्काळ त्यांनी मदतीसाठी आरडाओरडा केला. त्यांचा आवाज ऐकूनच शेजारी रहात असलेले ग्रामस्थ मदतीसाठी धावून आले व त्यांनी ढिगारा बाजूला करून सर्व जखमींना बाहेर काढले.

यावेळी डॉक्टरांना बोलावले असता डॉक्टरांनी गंभीर जखमी झालेली सुवर्णा अशोक मुकणे वय वर्षे ८ ही मृत झाल्याचे सांगितले तसेच ईतर जखमी झालेले संतोष मुकणे, तन्वी मुकणे, तुषार मुकणे यांना उपचारासाठी माणगाव उपजिल्हा रुग्णालयात येथे हलविण्यात आले आहे.

जखमी झालेले यांची परिस्थिती नाजूक असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी मुंबई येथील जे.जे. रुग्णालयात पाठविण्यात आले आहे. भिंत कोसळण्याची बातमी समजताच तळा तालुक्याचे आपत्ती व्यवस्थापन प्रमुख तहसीलदार श्री. कनशेट्टी यांनी ताबडतोब आपल्या सहकाऱ्यांसह अपघातस्थळी भेट दिली व सर्व शासकीय यंत्रणा कामाला लावून अपघातग्रस्त मुलांना दवाखान्यात नेण्याची व्यवस्था केली. गरीब कुटुंबावर आलेली आपत्ती पाहून तह-सीलदार कनशेट्टी यांनी शोक व संवेदना व्यक्त करीत त्यांना स्वखर्चातून आर्थिक मदत पाठविली.

मुंबई येथे रुग्णालयात दाखल होताच तहसीलदार यांनी समाजसेवक कृष्णा महाडिक यांना संपर्क करून माहिती दिली असता महाडिक यांनी ताबडतोब डॉक्टरांचे पथक बोलवून उपचार सुरू करण्यात आले. जखमी असलेल्यांपैकी एकाची तब्बेत नाजूक असली तरी ते उपचाराला चांगला प्रतिसाद देत असल्याचे डॉक्टरांनी यावेळी सांगितले आहे.

प्रशासकीय काम करत असताना तह-सीलदार कनशेट्टी यांनी केलेली आर्थिक मदत आणि प्रसंगावधनाचे गरीब कुटुंबाला केलेली मदत यावरून. होय, माणुसकी अजून जिवंत आहे. कोविडच्या काळात तहसीलदार यांनी चांगल्या प्रकारे काम केले आजही गरीब कुटुंबास त्यांनी केलेली मदत त्यांच्या या सामाजिक बांधिलकीचेही विविध स्तरांतून कौतुक होत आहे.

# सिडकोच्या मनमानी कारभाराला होणार पुन्हा विरोध

## २० तारखेला पारगाव येथे सर्वांनी मोठ्या संख्येने एकत्र जमण्याचे आवाहन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवी मुंबईतील प्रकल्प आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या कामासाठी सिडकोने पारगाव, ओवळे, कुंडेवहाळ या गावांना भूसंपादन करण्याबाबतच्या नोटीसा दिल्या आहे. त्या पार्श्वभूमीवर लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्वपक्षीय कृती समितीची बैठक समितीचे उपाध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी झाली. सिडकोने प्रलंबित असलेल्या समस्या आधी सोडवाव्यात आणि त्यानंतरच भूसंपदानाचा विषय काढावा, अशी ठाम भूमिका या बैठकीत मांडण्यात आली.

लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्वपक्षीय कृती समितीने सातत्याने केलेल्या आंदोलनामुळे जागे झालेल्या सिडको व शासनाने प्रकल्पग्रस्तांच्या गरजेपोटी बांधकामासंदर्भात नुकताच एक शासन निर्णय घेतला आहे, मात्र तो निर्णय प्रकल्पग्रस्तांच्या हिताचा नसून सिडको आणि शासनाच्या सोयीचा आहे. हा निर्णय घेताना प्रकल्पग्रस्त संघटना व त्यांच्या प्रतिनिधींकडून कुठल्याही सूचना मागविलेल्या नाहीत. प्रकल्पग्रस्तांच्या २५० मीटरबाहेरील बांधकामांचे काय होणार याचे उत्तर सिडकोकडून अनुत्तरित आहे. याबाबत लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्वपक्षीय कृती समितीची बैठक ०५ मे रोजी झाली होती. त्यामध्ये ९५ गावांतील शेतकर्यांची जमीन घेऊन अनेक प्रकल्प सिडकोने उभारले, मात्र आता गरजेपोटी घरांच्या बाबतीत सिडको व शासनाने घेतलेला निर्णय अन्यायकारक आहे. त्यामुळे या भूमीची मालकी हक्क असलेला प्रकल्पग्रस्त, भूमिपुत्र हा सिडकोने लादलेल्या निर्णयाच्या विरोधात असून प्रकल्पग्रस्तांच्या हक्कासाठी २४ जूनच्या नियोजित आंदोलनाप्रमाणे या विषयावरही आंदोलन करण्याचा इशारा त्या वेळी देण्यात आला होता.

सिडकोने पुन्हा पनवेल तालुक्यातील पारगाव, कुंडेवहाळ, ओवळे या गावांमधील जमीन नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या कामाकरिता संपादित करण्यात येणार असल्याच्या नोटीसा

…/२

### शुक्रवारी पारगाव येथे मोठ्या संख्येने एकत्र या : रामशेठ ठाकूर

या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सांगितले, विमानतळाच्या प्रकल्पासाठी तीनपट जमीन दिली तशी तीनपट जमीन आता बाधित होणाऱ्या प्रकल्पग्रस्तांना मिळाली पाहिजे आणि ती जमीन कुठे देणार तेही आम्हाला आताच सांगितले पाहिजे. तुमच्या तोंडी आश्वासनावर आमचा विश्वास नाही. आम्हाला उठवण्याअगोदर तुमची डेव्हलमेंटची कामे पूर्ण करा. त्यानंतर आम्ही निर्णय घेऊ. ज्या वेळी आपण आपली ताकद दाखवू त्या वेळीच यांचे डोळे उघडतील, असे मत व्यक्त करून येणाऱ्या शुक्रवारी २० तारखेला पारगाव येथे सर्वांनी मोठ्या संख्येने एकत्र जमावे. या वेळी दुसरा धक्का सिडकोला द्यावा लागेल. त्यासाठी गावोगावी जनजागृती करा, असेही त्यांनी सूचित केले.

# मंडळ अधिकारी, तलाठी लाचलुचपत विभागाच्या जाळयात

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

अलिबाग तालुक्यातील पोयनाड येथे खरेदी केलेल्या जागेच्या सातबारा उताऱ्यावरील नोंद मंजूर करण्यासाठी तीन हजार रूपयांच्या लाचेची मागणी करणारा मंडळ अधिकारी जगन्नाथ हिरू ठाकूर (वय ५५ वर्ष, मंडळ अधिकारी, चरी-तालुका अलिबाग जिल्हा रायगड, राहणार चेंढरे, अलिबाग,रायगड) याच्यासहित सुनील गजानन मोकल ( वय ५० वर्ष, खाजगी मदतनिस इसम ) तलाठी सजा शहापूर ता.अलिबाग, (रा.मोठे शहापूर, ता.अलिबाग) याना अलिबाग लाचलुचपत विभागाने ताब्यात घेतले आहे.

याबाबतची हकीकत अशी की, फिर्यादी यांनी पोयनाड तलाठी सजा यांच्या हद्दीत जागा खरेदी केली होती.

तक्रारदार यांनी खरेदी केलेल्या जमिनीचे सातबारा उताऱ्यावरील तलाठी सजा पोयनाड यांनी केलेली नोंद मंजूर करण्याकरिता आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदाराकडे तीन हजार रुपयांच्या लाचेची मागणी करून समक्ष खाजगी इसम आरोपी क्र. २ च्यामार्फत पोयनाड बाजारपेठ येथे स्वीकारत असताना पोलिस उपअधीक्षक सुष्मा सोनावणे यांच्या मार्गदर्शनाखाली अलिबाग लाच लूचपत विभागाने सापळा रचून ताब्यात घेतले आहे.

रायगड लाच लुचपत विभागाचे पोलीस उपअधीक्षक सुषमा सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार, अरुण करकरे, विनोद् जाधव, महेश पाटील, सचिन आटपटकर, पोलीस नाईक शरद नाईक चालक सहायक फौजदार अरुण घरत यांनी कारवाई केली आहे.

# पालीत संकष्टी चतुर्थीला भाविकांची मांदियाळी



**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

आय.एस.ओ मानांकन प्राप्त व महाराष्ट्रातील अष्टविनायकांपैकि प्रख्यात धार्मीक स्थळ असलेल्या पाली बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी दि.(१९) गुरुवारी संकष्टी चतुर्थीला पालीत भाविकांची अलोट गर्दी दिसून आली. कोव्हीडची लाट ओसरल्यानंतर धार्मिक स्थळे व पर्यटन स्थळांवर भाविक मोठ्या संख्येने दाखल होत आहेत. बाप्पाच्या चरणी गणेशभक्त नतमस्तक होऊन धन्य होतायेत. बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी नेहमीच


राज्य व देशातून भाविक भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थीत राह-तात. अशातच दर्शनासाठी येणार्या भाविकांच्या उत्तम सोईसुविधेसाठी बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्ट व प्रशासन नेहमीच दक्ष व सज्ज असते. मंदिरे दर्शनासाठी खुली झाल्याने दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या संख्येत कमालीची वाढ झाली आहे. सलग लागून आलेल्या सुट्टीत देखील भाविक मंदिरात मोठी गर्दी करीत आहेत. संकष्टी, अंगारकी चतुर्थी दिनी पालीत भाविक भक्तगणांची मांदीयाळी असते. तर माघी मासोत्सवाला संपुर्ण पाली गाव भाविक भक्तगणांनी फुलून जाते. अंगारकी संकष्टी नंतर आलेल्या संकष्टी ला देखील बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांनी गर्दीचा उच्चांक गाठला. अशावेळी भाविक भक्तगणांची कोणतीही गैरसोय होवू नये, त्यांना शिस्तबध्द पध्द-तीने रांगेत दर्शन घेता यावे यासाठी देवस्थान तसेच पोलीस प्रशासनाच्या वतीने आवश्यक ती खबरदारी घेत उपाययोजना करण्यात आली होती. सकाळपासूनच दर्शनासाठी रांगा लागल्या होत्या.

दर्शनासाठी रायगड जिल्हा, महाराष्ट्रातील

…/२

## संक्षिप्त...

### केतकीवर 'अट्रॉसिटी'चा गुन्हा दाखल, आता रबाळे पोलिसांनी घेतला ताबा



**दै.रायगड नगरी । मुंबई**

राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्याबद्दल समाज माध्यमांतून आक्षेपार्ह टिका केल्याप्रकरणी अभिनेत्री केतकी चितळे हिला ठाणे सत्र न्यायालयाने १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. तर, गोरेगाव पोलिसांनीही केतकीच्या कोठडीची मागणी केली असून ते तिचा ताबा घेणार आहेत. मात्र, तत्पूर्वीच रबाळे पोलिसांनी केतकीचा ताबा घेतला आहे. केतकीवर अट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल आहे. याप्रकरणी रबाळे पोलिसांनी तिला ताब्यात घेतलं आहे.

पोलिसांना केतकीच्या जामिनाबाबतीत ठाणे गुन्हे अन्वेषण विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्यांचे म्हणणे सांगावे असं न्यायालयाने सांगितले. तोपर्यंत जामीन अर्जावर सुनावणी होणार नव्हती. केवळ सायबर कलम ६६ अ अन्वये युक्तिवाद झाला आहे. केतकीचे वकील घनश्याम उपाध्याय यांनी बाजू मांडली. न्यायालयात केतकीच्या सुनावणीवेळी गोरेगाव पोलीस देखील तिचा ताबा घेण्यासाठी पोहोचले होते. गोरेगाव पोलिसांनी केतकीच्या कोठडीची मागणी केली होती. मात्र, केतकीचा ताबा देण्यात आला नव्हता. आता, रबाळे पोलिसांनीची केतकीचा ताबा घेतला आहे.

# महागाई, बेरोजगारी विरोधात २५ ते ३१ मे दरम्यान राज्यव्यापी आंदोलनाची हाक

**दै.रायगड नगरी । मुंबई**

संयुक्त शेतकरी कामगार मोर्चाची बैठक मुंबईत शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यालयात पार पडली. भाजपच्या मोदी सरकारच्या जनविरोधी आणि कॉर्पोरेटधार्जिण्या धोरणांविरुद्ध २५ ते ३१ मे या काळात महाराष्ट्रभर शहरी आणि ग्रामीण भागातील जनतेला संघटित करून प्रत्येक जिल्हा व तालुका स्तरावर प्रचंड मोर्चे व निदर्शने आयोजित करण्याचा निर्णय या बैठकीने घेतला. या बैठकीत न्यायमूर्ती बी. जी. कोळसे पाटील, डॉ. अशोक ढवळे, माजी आमदार विद्या चव्हाण, प्रकाश रेड्डी, प्रतिभा शिंदे, ॲड. राजू कोरडे, डॉ. एस. के. रेगे, प्रभाकर नारकर, धनंजय शिंदे, विजय कुलकर्णी, फिरोझ मिठीबोरवाला, जनार्दन जंगले, विशाल हिवाळे इत्यादी हजर होते.

महागाई आणि बेरोजगारीचा वरवंटा सर्वसामान्य शहरी आणि ग्रामीण जनतेवर फिरवला जात आहे. पेट्रोल, डिझेल व गॅसचे भाव गगनाला भिडले आहेत. त्यातील सर्वात मोठा वाटा केंद्र सरकारने लादलेल्या करांचा आहे. लाखो बेरोजगार तरुण-तरुणी बेरोजगारीच्या खाईत खितपत पडले आहेत. संयुक्त राष्ट्र संघाच्या जागतिक आरोग्य संघटनेने भारतात गेल्या दोन वर्षांत कोरोना महामारीमुळे तब्बल ४७ लाख लोक मृत्युमुखी पडले असल्याचे अनुमान काढले आहे. केंद्र सरकार मात्र फक्त ५ लाख लोक कोरोनामुळे दगावल्याचे सांगत आहे. जनतेच्या आरोग्यावर इतका भीषण हल्ला होऊनही सार्वजनिक आरोग्य व्यवस्था केवळ डबघाईला आली आहे एवढेच नव्हे तर तिचे जास्त खासगीकरण करण्याचा घाट घातला जात आहे. संसदेच्या येत्या पावसाळी सत्रात केंद्र सरकार सार्वजनिक आरोग्याबाबत एक घातक विधेयक आणण्याच्या तयारीत आहे. मोदी सरकारच्या नवीन शैक्षणिक धोरणाच्या बाजारीकरण, केंद्रीकरण आणि धर्मांधकरणाच्या त्रिसूत्रीमुळे लाखो विद्यार्थी आणि शिक्षकांच्या भवितव्यावर गदा आणली जात आहे.

कामगारवर्गावर गुलामी लादणाऱ्या चार श्रम संहिता मोदी सरकार रद्द करण्यास तयार नाही. वर्षभर चाललेल्या ऐतिहासिक शेतकरी आंदोलनाने तीन कृषी कायदे रद्द करण्यास भाजप सरकारला भाग पाडले, पण शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चाच्या दीडपट हमी भावाचा कायदा करण्यास हे सरकार तयार नाही. महाराष्ट्रात अतिरिक्त उसाचा आणि पीक विम्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. मनरेगावर बजेटमध्ये कपात करून शेतमजुरांना वाऱ्यावर सोडले जात आहे. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे भाजपच्या केंद्र सरकारने खासगीकरणाद्वारे संपूर्ण देशच विकायला काढला आहे. नुकतेच भारतीय आयुर्विमा महामंडळाचे

…/२

# केतकी चितळेची वादग्रस्त पोस्ट शेअर करणाऱ्याला पनवेल पोलिसांनी केले गजाआड

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्याविरोधात अभिनेत्री केतकी चितळे हिने वादग्रस्त फेसबुक पोस्ट केली होती. आणि तिची पोस्ट शेअर करणाऱ्या पनवेल येथील किरण इनामदार याला शुक्रवार दिनांक २० मे पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. विशेष म्हणजे पोलिसांनी पाच दिवसांची पोलीस कोठडीची मागणी केली होती मात्र न्यायालयाने केवळ एकच दिवसाच्या पोलीस कोठडीचा आदेश केलेला आहे .

केतकी चितळेने शरद पवार यांच्याबद्दल बदनामीकारक फेसबुक पोस्ट केली होती. हीच पोस्ट किरण इनामदार तरुणाने शेअर केली होती. या प्रकरणी किरण इनामदार याच्यावर पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. त्यांनतर आज (गुरुवारी) त्याला पनवेल न्यायालयात हजर करण्यात आले होते. त्यावेळी पोलिसांकडून पाच दिवसांच्या पोलीस कोठडीची मागणी करण्यात आली. किरण इनामदार यांच्या तर्फे पनवेल मधील विधीतज्ञ चेतन जाधव यांनी न्यायालयात बाजू मांडताना कमल १५३अ लागू होणार नाही आसा युक्तिवाद केला आहे.

# पर्यटकांना दर्जेदार सुविधा मिळण्यासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ आणि खाजगी विकासकांमध्ये करार



**दै.रायगड नगरी । मुंबई**

कोविडचा प्रादुर्भाव संपल्यानंतर सेवा आणि आदरातिथ्य क्षेत्राच्या वाढीसाठी मोठा वाव आहे. हे लक्षात घेऊन राज्यातील पाच पर्यटनस्थळांवर पर्यटकांना दर्जेदार निवास सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी खाजगी उद्योजकांबरोबर करार करण्यात आला असल्याची माहिती पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे यांनी दिली.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या ताब्यातील शासकीय जमिनीचा खाजगीकरणाच्या माध्यमातून पर्यटनदृष्ट्या विकास करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. याअंतर्गत महाबळेश्वर, माथेरान, मिठबाव, हरिहरेश्वर आणि ताडोबा येथे निवास सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी आज खासगी विकासकांना सवलतीचे करारपत्र देण्यात आले. यावेळी पर्यटन राज्यमंत्री कु. आदिती तटकरे, प्रधान सचिव वल्सा नायर सिंह, महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक जयश्री भोज, वरिष्ठ व्यवस्थापक संजय ढेकणे आदी उपस्थित होते.

श्री.ठाकरे म्हणाले की, राज्यात सर्व प्रकारची पर्यटनस्थळे आहेत. येथे पर्यटकांना दर्जेदार सोयी सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी शासन प्रयत्नशील आहे. यासाठी पहिल्या टप्प्यात पाच पर्यटनस्थळांची निवड करण्यात आली आहे. महाबळेश्वर, माथेरान, मिठबाव व हरीहरेश्वर येथील पर्यटन निवांसाकरिता व ताडोबा येथील मोकळ्या जागेकरिता

…/२

# माता भगिनींच्या चेहऱ्यावरील आनंद ही केलेल्या कामाची पोचपावती : खा.सुनील तटकरे

**दै.रायगड नगरी । तळा**

कर्नाळा येथील पाणी पुरवठा योजनेचा लोकार्पण सोहळा खा.सुनील तटकरे यांच्या हस्ते पार पडला या योजनेचे लोकार्पण केल्या नंतर आपले मनोगत व्यक्त करताना खा.सुनील तटकरे यांनी पाणी हा महिलांसाठी जिव्हाळ्याचा प्रश्न पाणी योजनेचे लोकार्पण झाल्यानंतर माता भगिनींच्या चेहऱ्यावरील आनंद हीच खरी आम्ही केलेल्या कामाची पोचपावती असल्याचे यावेळी सांगितले. या लोकार्पण सोहळ्यासाठी तळा तालुका राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष नाना भौड, महिला अध्यक्षा जान्हवी शिंदे, माजी बालकल्याण सभापती गीता जाधव, उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे, माजी पंचायत समिती सभापती अक्षरा कदम, मागासवर्गीय सेल रायगड जिल्हा अध्यक्ष अॅड.उत्तम जाधव, कैलास पायगुडे, किशोर शिंदे, परशुराम वरंडे, कृष्णा चाळके कर्नाळा ग्रामस्थ महिला मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



खा.तटकरे पुढे म्हणाले की, आज वारकरी संप्रदाय समाज मंदीराचे भूमिपूजन देखील माझ्या हस्ते पार पडले आता काही दिवसातच वारीचे वेध लागतील महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून सर्व वारकरी दिंडीच्या रूपातून विठ्ठलाच्या दर्शनाला जातील दर्शनाला जात असताना उन पाऊस वारा या सगळ्यांची तमा न बाळगता हरिनामाचा जप करत विठ्ठल नामाचा जप करत सर्व वारकरी संप्रदाय पंढरपूरच्या दिशेने जातात माझ्या साठी विठ्ठल रखुमाई कोण आहेत हे समोर बसलेले लोक आहेत त्यांच्या चरणी सेवा करण्याचे अवचीत्य मिळाले हे मी माझे भाग्य समजतो. विकास कामांची दिंडी आज गावा गावामध्ये येत आहे त्याच्यामध्ये तुमची आयुष्य भराची साथ मिळाली त्यामुळे कठीण असणारे काम सहज सोपे झाले. माते समान असलेल्यांच्या चेहऱ्यावर आनंदाश्रू पाहायला मिळाले आज मी खासदार झालो, अदिती आमदार मंत्री झाली मी मंत्री पदाची शपथ घेतली त्याही पेक्षा मला आज झालेला आनंद खूप मोठा असल्याचे त्यांनी सा ंगितले.

माणसाच्या जीवनाचे नेमके कर्म कोणते ज्या पद्धतीने लोकांची सेवा करण्याची संधी मला उपलब्ध करून दिली समर्पित आणि निरपेक्ष भावनेने काम केले की, लोककल्याणाचा आनंद आपल्याला पाहायल मिळतो असे त्यांनी यावेळी सांगितले. या गावचे आणि माझे ऋणानुबंध असून जिल्हा परिषद अध्यक्ष पदापासून आज पर्यंत या गावातील विकासकामांना चालना दिली असल्याचे त्यांनी सांगितले येणारी कामे देखील पूर्ण करणार असल्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. पाणी पुरवठा योजनेचे लोकार्पण आज झाले या योजनेचे संगोपन करण्याची जवाबदारी आता ग्रामस्थांची आहे.पाणी सर्वांना मिळेल या पद्धतीने काटेकोर पणे नियोजन सर्वांनी करावे असे त्यांनी यावेळी सांगितले.

कर्नाळा गावासाठी टँकरने पाणी पुरवठा करण्याची वेळ एप्रिल आणि मे महीन्यात शासनावर दरवर्षी येत होती.येथील महीला व ग्रामस्थांना हंडाभर पाण्यासाठी वणवण करावी लागत होती भीषण पाणी टंचाई असल्याने ग्रामस्थ व महीलांचे पाण्यावाचुन हाल होत होते दर वर्षी तहसिलदारांकडे टँकरने पाणी पुरवठा करण्याची मागणी ग्रामस्था दरवर्षी करत असतात परंतु खा.सुनील तटकरे यांनी आज टँकरने पाणी पुरवठा करण्याची वेळ गावावर आणू दिली नाही मुबलक पाणीपुरवठा आता कर्नाळा गावाला मिळणार असून खा.सुनील तटकरे यांचे मानावे तेवढे आभार कमीच पडतील असे माजी सरपंच कृष्णा चाळके यांनी सांगितले.

# वनवासी कल्याण आश्रमची जनजाती आरक्षण मोहीम

**दै.रायगड नगरी । उरण**

बुधवार दि.१८/५/२०२२ रोजी वनवासी कल्याण आश्रम च्या वतीने जनजाती आरक्षण मोहीम घेण्यात आली. त्या अनुषंगाने उरण तालुक्यातील पुनाडे वाडीवर जनजागृती मोहीम घेण्यात आली. काही जनजाती बांधवानी धर्मातर करून ते दोन्ही ठिकाणी फायदे घेत आहेत. त्यामुळे मुळ जनजाती बांधवांचे शैक्षणिक तसेच सरकारी नोकरीच्या दृष्टीने राखीव जागांबाबत नुकसान होत आहे. अश्या धर्मांतरित लोकांना एस टी कॅटॅगरीचे फायदे दिले जाऊ नये.

यासाठी सरकार दरबारी निवेदन देणे यासाठी रायगड जिल्ह्यातून यासाठी दिनांक २९/५/२०२२ रोजी मराठा समाज सभागृह, पेण येथे सभेचे आयोजन केले आहे. पुढच्या आपल्या जनजातीच्या भावी पिढीच्या आरक्षण तरतुदी साठी व आरक्षणाचा फायदा मूळ जनजाती बांधवनाच मिळावा या साठी मोठ्या संख्येने या सभेस येण्याचे आवाहन वनवासी कल्याण आश्रम उरण तालुका अध्यक्ष मनोज ठाकूर यांनी यावेळी केले.

मा.पांडे साहेब कोर्ट

**अर्जदाराचे वकील : अॅड.अनिल एस. जाधव**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो. यांचे कोर्टात

**फौ.चौ.अर्ज क्र.३९९/२०२२**
**नि.नं.७/ड**
**ने.ता.१५/०६/२०२२**

श्री.राकिफ नसीम सोंडे — अर्जदार

विरुद्ध

पनवेल महानगरपालिका — सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते आहे की, अर्जदार यांचा मुलगा कु.मुहमंद साद राकिफ सोंडे यांचा दि.२९/०४/२०१७ रोजी मौजे : पटेल मोहल्ला, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र येथे जन्म झालेला आहे. सदरहू अर्जदार यांनी त्यांच्या जन्माच्या तारखेची नोंद होणेकरिता सदरचा अर्ज नामदार कोर्टात दाखल केलेला आहे.

कु.मुहमंद साद राकिफ सोंडे यांचा वर नमूद ठिकाणी जन्म झाले आहे किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर किंवा सदर अर्जदारांनी दाखल केलेल्या अर्जाबाबत कोणत्याही कसल्याही हरकती असल्यास सदरच्या हरकती ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्यात मे.कोर्टात दाखल कराव्यात. मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व सदरहू न्यायालय अर्जदार यांच्याकडे सदरहू कु.मुहमंद साद राकिफ सोंडे यांचे जन्माची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्यानिशी आज रोजी दि.११/०५/२०२२ रोजी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**फौ.न्या.क.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**फौ.न्या.क.स्तर, पनवेल**

# ओबीसी मंत्र्यांनो आता तरी समाजासाठी हिंमत दाखवा : आ.प्रशांत ठाकूर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाविकास आघाडी सरकारच्या बेफिकीरीमुळे ओबीसी राजकीय आरक्षण राज्यात गमावले व ते पुन्हा मिळत नाही. सरकारमधील ओबीसी मंत्र्यांनी आता तरी लाचारी सोडावी आणि ओबीसींना राजकीय आरक्षण मिळण्यासाठी मंत्रिपदाचा राजीनामा देण्याची हिंमत दाखवावी, असे आव्हान भारतीय जनता पार्टीचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी गुरुवारी दिले.



आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, ओबीसींना राजकीय आरक्षण देताना ते किती प्रमाणात द्यावे हा प्रश्न आहे व त्यासाठी समर्पित आयोगामार्फत एंपिरिकल डेटा अर्थात ओबीसींची वस्तुस्थितीनुसार आकडेवारी गोळा करून प्रमाण ठरवणे आणि एकूण आरक्षण ५० टक्क्यांच्या मर्यादेत ठेवणे गरजेचे आहे. सर्वोच्च न्यायालयाने ०४ मार्च २०२१ रोजी महाराष्ट्रातील ओबीसी राजकीय आरक्षण स्थगित करतानाच ते पुन्हा लागू करण्यासाठी ही तिहेरी चाचणी पूर्ण करण्यास सांगितले होते. मात्र महाविकास आघाडी सरकारने नेमके हेच काम केले नसल्याने राज्यातील ओबीसी राजकीय आरक्षण पुन्हा लागू होत नाही. दुसरीकडे मध्य प्रदेशने न्यायालयाच्या आदेशानंतर ताबडतोब डेटा गोळा करून चाचणी पूर्ण केली व ओबीसी आरक्षण पुन्हा मिळवले. मध्य प्रदेशमधील भाजपा सरकारच्या यशानंतर महाविकास आघाडी सरकारचे अपयश पुन्हा स्पष्ट झाले आहे. या सरकारमधील ओबीसी मंत्र्यांनी आता तरी सत्तेची लाचारी सोडावी आणि सरकारवर दबाव आणण्यासाठी मंत्रिपदाचा राजीनामा देण्याची हिंमत दाखवावी.

एंपिरिकल डेटा गोळा करून तिहेरी चाचणी पूर्ण केली की ओबीसी राजकीय आरक्षण परत मिळणार हे सर्वो च्च न्यायालयाच्या ०४ मार्च २०२१ च्या निकालापासूनच स्पष्ट होते. परंतु आता मध्य प्रदेशचा निकाल आल्यावर नवा शोध लागल्यासारखे या सरकारचे मंत्री महाराष्ट्रालाही आपोआप आरक्षण मिळेल अशी दिशाभूल करत आहेत. महाविकास आघाडीने एंपिरिकल डेटा गोळा करण्यात अक्षम्य टाळाटाळ केल्यामुळेच ओबीसींना परत आरक्षण मिळत नाही. या अपयशाची जबाबदारी सरकारमधील ओबीसी मंत्र्यांचीही आहे. त्यामुळेच त्यांनी आता तरी समाजासाठी हिंमत दाखवावी व ओबीसी आरक्षणा साठी प्रयत्न करावे व मध्य प्रदेशप्रमाणे महाराष्ट्राने तिहेरी चाचणी पूर्ण करून आरक्षण परत मिळविण्यासाठी मंत्रिपदाचे राजीमाने देऊन सरकारवर दबाव आणावा आणि त्यासाठी ओबीसी मंत्र्यांनो आता तरी समाजासाठी हिंमत दाखवावी, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी आव्हानात्मक प्रतिक्रिया ओबीसी आरक्षणासंदर्भात व्यक्त केली आहे.

# तीस वर्षीय महिला बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

करंबेळी- मोरबे, पनवेल येथील तीस वर्षीय महिला घरात कोणाला काहीही न सांगता कपड्याची बॅग घेऊन निघून गेली आहे. त्यामुळे ती हरवली असल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

सुकरी अर्जुन पारधी या महिलेची उंची दीडशे सेमी, रंग निमगोरा, चेहरा उभट आहे. तिने अंगात गुलाबी रंगाची साडी, ब्लाउज, गळ्यात मंगळसूत्र, हातात हिरव्या बांगड्या घातल्या आहेत. तिच्या हातावर सुकरी अर्जुन पारधी असे गोंदविलेले आहे.

या महिलेबाबत अधिक माहिती असल्यास पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे संजय दोरगे ८१०८१६७१०४ यांच्याशी संपर्क साधावा.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसद्वारे सुचित करण्यात येत आहे की, सदरहू मिळकत श्री.अविनाश राजाराम म्हात्रे रा.चिरनेर, ता.उरण, जि.रायगड यांनी खालील मिळकत साठेकराराद्वारे त्यावेळी पूर्ण मोबदला विकत घेतल्या आहेत. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे : पुनाडे, ता.उरण, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|---|
| ८ | ३/२ | ०-१५-०<br>पो.ख. ०-२-०<br>एकूण ०-१७-० | ०.३४ |

येणेप्रमाणे सदर मिळकतीचे वर्णन आहे.

मौजे : पुनाडे, ता.उरण, जि.रायगड येथील सर्व्हे नं. / हिस्सा नं.८/३/२ क्षेत्र ०-१७-० (हे.आर.पॉ.) एवढी मिळकत आमचे अशिल श्री.अविनाश राजाराम म्हात्रे यांनी साठेकरार करून मुळ मालक श्रीमती.यमुना दगडू म्हात्रे व श्रीमती.अर्चना दगडू म्हात्रे यांना जमीन मिळकतीचा पूर्ण मोबदला अदा करून सदरहू मिळकतीचा ताबेकब्जा, वहिवाट आमचे अशिलांना मुळ मालक यांनी दिला असून आजतागायत सदरच्या मिळकती आमचे अशिलांच्या शांततामय, ताबेकब्जात, व वहिवाटीत अखंडीत आहे. मात्र मुळ मालक यांच्या चाल-ढकल व वेळकाढू पणामुळे सदरहू मिळकतीचे नोंदणीकृत खरेदीखत आमचे अशिलांची करण्याची इच्छा व तयारी असताना मुळ मालक श्रीमती.यमुना दगडू म्हात्रे व श्रीमती.अर्चना दगडू म्हात्रे यांच्या वेळकाढुपणामुळे खरेदीखत नोंदणीकृत करण्याचे राहून गेले आहे. आजतागायत देखील सदरहू मिळकतीवर आमच्या अशिलांचा ताबेकब्जा व वहिवाट आहे.

तरी सदरहू मिळकतीचे संदर्भात कोणीही वरील मिळकतीमध्ये कसल्याही प्रकारचे करार-मदार, गहाणखत, खरेदीखत, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. व तत्सम दस्त केल्यास ते दस्त आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

दि.१९/०५/२०२२

**सही/-**
**अॅड.दिनेश दत्तात्रेय पाटील**
**जय नारायण बिल्डींग, गाळा नं.४,**
**गावदेवी मंदिरासमोर, राम गणेश गडकरी मार्ग, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.८८७९८९७०६९**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील नमूद केलेली मिळकत ही श्री.प्रभाकर पांडुरंग जाधव यांचे नावे महसूल दप्तरी ७/१२ चे कब्जेदार सदरी आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : मोहपे, ता.पनवेल, जि.रायगड**

| मालक/कब्जेदाराचे नांव | सर्व्हे नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| प्रभाकर पांडुरंग जाधव | ७/२ | ०-१६-०० | १-८८ |

मौजे : मोहपे, ता.पनवेल, जि.रायगड येथील वर नमूद मिळकतीचे जमीन मालक ७/१२ मधील नमूद कब्जेदार श्री.प्रभाकर पांडुरंग जाधव यांची वरील नमूद शेतजमीन मिळकत आमचे अशिलांनी कायमस्वरुपी नोंदणीकृत खरेदीखताचे अनुषंगाने विकत घेण्याचे ठरविले आहे.

सदर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा कब्जा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांच्या आत प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल वर नमूद जमीन मालक / कब्जेदार यांचे बरोबर ठरविलेला कायम खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १८/०५/२०२२

**सही/-**
**मयुरेश प्र. हनुमंते**
**अॅडव्होकेट-हायकोर्ट**
**शॉप नं.बी/१०१, योगेश्वर कृपा बिल्डींग,**
**ठाणा नाका रोड, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.८२८६१२१३३३**

पृष्ठ क्र.१ वरुन...

## सिडकोच्या मनमानी कारभाराला होणार पुन्हा विरोध

प्रकल्पग्रस्तांना दिल्या आहेत. त्या पार्श्वभूमीवर आगरी समाज मंडळाच्या पनवेलमधील सभागृहात लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्वपक्षीय कृती समितीची बैठक समितीचे उपाध्यक्ष लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या वेळी जमिनीचा जो सर्व्हे २० मे रोजी पारगाव व २३ तारखेला कुंडेवहाळ येथे होणार आहे त्याला समितीने विरोध दर्शविला. विविध समस्यांबाबत ग्रामस्थ अनेक वर्षांपासून पाठपुरावा करीत आहेत तसेच विमानतळाच्या भरावामुळे गावे पाण्याखाली बुडत आहेत. त्याकडे सिडको जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे. सिडकोने सर्वप्रथम या सर्व प्रलंबित समस्या सोडवाव्यात आणि त्यानंतरच भूसंपादनाचा विषय काढावा, अशी भूमिका या बैठकीतून मांडण्यात आली.

या बैठकीला लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्वपक्षीय कृती समितीचे कार्याध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, सरचिटणीस भूषण पाटील, भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, ओबीसी सेल उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष राजेश गायकर, पनवेल महापालिकेचे स्थायी समिती सभापती नरेश ठाकूर, भाजप जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, रूपेश धुमाळ, सुनील कटेकर, विनोद म्हात्रे यांच्यासह पदाधिकारी, प्रकल्पग्रस्त उपस्थित होते.

## महागाई, बेरोजगारी विरोधात २५ ते ३१ मे दरम्यान राज्यव्यापी आंदोलनाची हाक

समभाग विकायला काढले गेले. वरील सर्व प्रश्नांवर २५ ते ३१ मे या काळात महाराष्ट्रभर जोरदार आंदोलन करण्याची हाक संयुक्त शेतकरी कामगार मोर्चाने दिली आहे.

भाजपच्या केंद्र सरकारच्या हुकूमशाही व धर्मांध कारस्थानांवरही बैठकीत झोड उठवण्यात आली. राजकीय विरोधकांवर ई.डी., सी.बी.आय., इन्कम टॅक्स या केंद्रीय संस्था आणि यु.ए.पी.ए., देशद्रोह, रासुका अशा कायद्यांचा सर्रास वापर करणे, भीमा कोरेगाव प्रकरणातील राजबंद्यांवर तीन वर्षे झाली तरी अजूनही आरोपपत्र दाखल न करणे, जनतेचे लक्ष तिच्या ज्वलंत प्रश्नांपासून विचलित करण्यासाठी धर्मांध ध्रुवीकरणाचा हर मार्ग वापरणे या सर्वांचा कसून प्रतिकार करण्याचे ठरले.

## पालीत संकष्टी चतुर्थीला भाविकांची मांदियाळी

विविध भागांसह मुंबई, ठाणे पुणे आदी शहरांतील भाविक व पर्यटक मोठ्या प्रमाणावर पालीत दाखल झाले होते. गर्दी असल्याने येथील दुकानदार व हॉटेल व्यवसायिकांचा धंदा देखिल तेजीत होता. बल्लाळेश्वर मंदिर परिसरात गावठी भाज्या, फळे, कंदमुळे व रानमेवा घेऊन अनेक महिला विक्रेत्या बसल्या होत्या. देवळात येणारे भाविक आवर्जून ते खरेदी करत होते. त्यामुळे या विक्रेत्यांचा धंदा चांगला झाला.

संकष्टी चतुर्थीनिमित्त मंदिर परिसरातील दुकाने व हॉटेल ग्राहकांनी गजबजले होते. परिसरातील हॉटेल, खेळण्याची व शोभिवंत वस्तुंची दुकाने, नारळ, हार , फुल व पापड मिरगुंड, कडधान्य विक्रेते, प्रसाद व पेढेवाले जय्यत तयारीत होते. मंदिर परिसरात मोठी वर्दळ पहायला मिळत होती. जणूकाही यात्रेचे स्वरूप आले होते. भाविकांच्या सोईसाठी बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने चोख व्यवस्था करण्यात आली होती.बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टचे पदाधिकार्यांनी पाली बल्लाळेश्वर देवस्थानात येणार्या भाविक भक्तगणांना आतंरराष्ट्रीय दर्जाच्या सेवासुविधा मिळाव्यात यादृष्टीने सुनियोजन केले आहे. त्यामुळे भाविकांनी समाधान व्यक्त केले.

## महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ आणि खाजगी विकासकांमध्ये करार

निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली असून पात्र विकासकांची नियुक्ती पूर्ण झालेली आहे. शासन आणि विकासकांचा हा संयुक्त उपक्रम असणार आहे. आपला देश आणि महाराष्ट्र हे आदरातिथ्यासाठी ओळखले जातात. कोविड नंतर या क्षेत्रात पुन्हा संधी निर्माण झाली असून राज्यातील पर्यटन क्षेत्र जगभर ओळखले जावेत यासाठी शासन विविध पातळ्यांवर प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले. यासाठी आदरातिथ्य क्षेत्राला उद्योगाचा दर्जा देण्यात आला असून विविध परवान्यांची संख्या कमी करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. राज्यमंत्री कु.तटकरे म्हणाल्या की, शासनाचा हा पथदर्शी प्रकल्प असून यामुळे पर्यटनस्थळांवर पायाभूत सोयी-सुविधा उपलब्ध होतील. यामुळे पर्यटकांची संख्या वाढून पर्यटनस्थळांच्या विकासाला मोठा हातभार लागेल. प्रधान सचिव वल्सा नायर सिंह यांनी केरळ शासनाने असा संयुक्त उपक्रम राबविल्याचे उदाहरण देऊन महाराष्ट्रात पर्यटकांचा त्यापेक्षाही अधिक प्रतिसाद मिळेल असा विश्वास व्यक्त केला. तर, एमटीडीसीच्या व्यवस्थापकीय संचालक जयश्री भोज यांनी प्रास्ताविकाद्वारे या उपक्रमाची माहिती दिली.

पर्यटन धोरणाच्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी तसेच राज्यात पर्यटन प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी आणि विकासासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास शासनाने राज्यात अनेक शासकीय जमिनी उपलब्ध करून दिल्या आहेत. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडे असलेल्या मोकळ्या जमिनी तसेच विकसित केलेल्या मालमत्ता भाडेतत्वावर देऊन पर्यटन क्षेत्रात खाजगी भागीदारी वाढविण्यासाठी आणि राज्यातील पर्यटनस्थळांचा जागतिक मानकांनुसार विकास करण्यासाठी दि. १७ ऑगस्ट २०२० रोजी राज्य शासनाने शासन निर्णय निर्गमित केला. या धोरणानुसार महामंडळाच्या ताब्यातील शासकीय जमिनींचा/ मालमत्तांचा खाजगीकरणाच्या माध्यमातून पर्यटनदृष्ट्या विकास करण्यासाठी जमीन भाडेपट्टा / जॉइंट व्हेंचर / नॉन जॉइंट व्हेंचर / प्रवर्तन आणि व्यवस्थापन इत्यादी उपलब्ध पर्यायांचा विचार करून निर्णय घेण्याकरिता प्रकल्प सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली. सल्लागाराने सादर केलेल्या अहवालावर प्रत्येक पर्यटन स्थळासाठी योग्य पर्यायाची निवड करण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती गठित करण्यात आली. यानुसार निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून पात्र विकासकांची नियुक्ती झाली आहे. महाबळेश्वरसाठी टी एन्ड टी इन्फ्रा, माथेरानसाठी ह्रिदम हॉस्पिटॅलिटी, हरिहरेश्वरसाठी महिंद्रा हॉलिडेज, मिठबावसाठी रिसॉर्ट हब टाऊन आणि ताडोबासाठी द लीला /ब्रूकफिल्ड यांच्यासमवेत करार करण्यात आला आहे.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसद्वारे सुचित करण्यात येत आहे की, सदरहू मिळकत श्री.अविनाश राजाराम म्हात्रे रा.चिरनेर, ता.उरण, जि.रायगड यांनी खालील मिळकत साठेकराराद्वारे त्यावेळी पूर्ण मोबदला विकत घेतल्या आहेत. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे : पुनाडे, ता.उरण, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|---|
| ८ | ४ | ०-३८-०<br>पो.ख. ०-८-०<br>एकूण ०-४६-० | ०.८६ |

येणेप्रमाणे सदर मिळकतीचे वर्णन आहे.

मौजे : पुनाडे, ता.उरण, जि.रायगड येथील सर्व्हे नं. / हिस्सा नं.८/४ क्षेत्र ०-४६-० (हे.आर.पॉ.) एवढी मिळकत आमचे अशिल श्री.अविनाश राजाराम म्हात्रे यांनी साठेकरार करून मुळ मालक श्री.धर्मा हाल्या पाटील, श्री.सहदेव सावळाराम पाटील व द्वारकाबाई नारायण म्हात्रे यांना जमीन मिळकतीचा पूर्ण मोबदला अदा करून सदरहू मिळकतीचा ताबेकब्जा, वहिवाट आमचे अशिलांना मुळ मालक यांनी दिला असून आजपर्यंत सदरच्या मिळकती आमचे अशिलांच्या शांततामय, ताबेकब्जात, व वहिवाटीत अखंडीत आहे. मात्र मुळ मालक यांच्या चाल-ढकल व वेळकाढू पणामुळे सदरहू मिळकतीचे नोंदणीकृत खरेदीखत आमचे अशिलांची करण्याची इच्छा व तयारी असताना मुळ मालक श्री.धर्मा हाल्या पाटील, श्री.सहदेव सावळाराम पाटील व द्वारकाबाई नारायण म्हात्रे यांच्या वेळकाढुपणामुळे व त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे वारस यांनी वेळकाढूपणा केल्यामुळे खरेदीखत नोंदणीकृत करण्याचे राहून गेले आहे. आजतागायत देखील सदरहू मिळकतीवर आमच्या अशिलांचा ताबेकब्जा व वहिवाट आहे.

तरी सदरहू मिळकतीचे संदर्भात कोणीही वरील मिळकतीमध्ये कसल्याही प्रकारचे करार-मदार, गहाणखत, खरेदीखत, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. व तत्सम दस्त केल्यास ते दस्त आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

दि.१९/०५/२०२२

**सही/-**
**अॅड.दिनेश दत्तात्रेय पाटील**
**जय नारायण बिल्डींग, गाळा नं.४,**
**गावदेवी मंदिरासमोर, राम गणेश गडकरी मार्ग, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.८८७९८९७०६९**

## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येत आहे की, मौजे : निताळे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील खाली वर्णन केलेली जमीन मिळकत ही मुळ जमीन मालकांकडून मी कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहे. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : निताळे, तालुका : उरण, जिल्हा : रायगड**

| गांव | भोगवटादाराचे नांव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| निताळे | शांताबाई रामदास पाटील<br>उद्धव रामदास पाटील<br>जयवंत रामदास पाटील<br>शेवंताबाई भास्कर माळी<br>लक्ष्मीबाई सखाराम ठोंबरे<br>दया लक्ष्मण पाटील<br>अंजना विजय भोपी | २६/२/ब/२ | ०-४९-००<br>पोटखराबा ०-०३-८०<br>एकूण क्षेत्र ०-५२-८० | ८.९६ |
| | | पैकी खरेदी क्षेत्र | ०-१७-२७ | |

सदरहू जागा, जमीन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षिस, लीज, पोटगी, कोर्ट, जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, मालकी, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधितांना ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न झाल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरुन मी वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करेन व विहित मुदतीच्यानंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती / तक्रारी या माझेवर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १९/०४/२०२२

**सही/-**
**श्री.बाळाराम राघो पाटील**
**रा.तोंडरे, पो.तोंडरे, ता.पनवेल,**
**जि.रायगड-४१०२१८**
**मोबा नं.९९६७२६७७७१**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# विद्यापीठाचे तंत्रज्ञान शेतकऱ्यांना सहज समजणाऱ्या भाषेत प्रसारित व्हावे : डॉ.ए.के.सिंग



**दै.रायगड नगरी । दापोली**

वाढत्या लोकसंख्येच्या अन्नधान्याची गरज भागविण्यासाठी नावीन्यपूर्ण तंत्रज्ञान वापरून अन्नधान्य व फळपिके उत्पादनात वाढ करणे तसेच नागरिकांना संतुलित पोषक आहार उपलब्ध करून देणे महत्त्वाचे असल्याने विद्यापीठाचे तंत्रज्ञान शेतकऱ्यांना सहज समजणार्या भाषेत प्रसारित व्हायला हवे, असे मार्मिक प्रतिपादन भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्लीच्या फलोत्पादन विभागाचे उपमहासंचालक डॉ.ए.के.सिंग यांनी येथे केले. डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाच्या ५० व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. संजय सावंत होते

व्यासपीठावर डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाचे माजी कुलगुरूव्दय डॉ. श्रीरंग कद्रेकर व डॉ. शंकरराव मगर, विस्तार शिक्षण संचालक डॉ. संजय भावे, संशोधन संचालक डॉ. पराग हळदणकर, शिक्षण संचालक डॉ. सतीश नारखेडे, कुलसचिव डॉ. भरत साळवी, कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. उत्तम महाडकर, कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. उत्तम कदम, निम्नस्तर कृषि शिक्षण विभागाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. आनंद नरंगलकर,क्रीडा व सहशैक्षणिक उपक्रमाचे संचालक डॉ. विठ्ठल नाईक व विद्यापीठ अभियंता निनाद कुलकर्णी उपस्थित होते.

डॉ. ए.के.सिंग पुढे म्हणाले की, देशात कृषि उत्पादन वाढीसाठी रासायनिक खतांचा भरमसाठ वापर होत असल्याने पाणी, जमीन व हवा प्रचंड प्रमाणात प्रदूषित होत असून त्याचा मानवी जीवनावर अत्यंत विपरीत परिणाम होत आहे. हे न थांबल्यास येणारी पिढी आपणास माफ करणार नाही. स्वातंत्र्यानंतर अन्नधान्य, फळपिके उत्पादनात भारताने मोठी मजल मारली असून ८ ते ९ कोटी जनतेला विनामूल्य अन्न वितरित केले जात आहे. आपल्या देशातील जनतेची जितकी अन्नधान्याची गरज आहे, त्यापेक्षा जास्त अन्नधान्याची नासाडी दरवर्षी होत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. कोव्हीड- १९ मध्ये देशाच्या अर्थव्यवस्थेला कृषीनेच तारल्याचे पुरेसे स्पष्ट झाले असून भविष्यात कृषी क्षेत्रात खूप संधी असल्याने शाश्वत उत्पादनासाठी नवनवीन संकल्पना स्थापित करून युवक, शेतकऱ्यांना प्रोत्साहित करण्याची भूमिका विद्यापीठाने वठवावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना डॉ. संजय सावंत यांनी विद्यापीठाच्या तंत्रज्ञानाची माहिती शेतकऱ्यांच्या मुखातून व्हायला हवी, अशी अपेक्षा व्यक्त करीत सुवर्ण पालवी कृषि महोत्सव यशस्वी करणाऱ्या तसेच त्यात सहभागी होणाऱ्या सर्वांचे आभार व्यक्त केले. उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या सर्व महाविद्यालये व संशोधन केंद्राच्या अधिकारी तसेच कर्मचाऱ्यांचा विद्यापीठाच्या ५१ व्या वर्धापन दिनी गौरव केला जाईल, असे त्यांनी आश्वस्त केले.

यावेळी डॉ. श्रीरंग कद्रेकर व डॉ. शंकरराव मगर यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाचे माजी अधिष्ठाता डॉ. प्रभाकर वराडे यांच्या ' काळ्या मातीतून लाल मातीकडे ' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ.ए. के. सिंग यांच्या हस्ते झाल्यावर डॉ. वराडे यांनी मनोगतात कुलगुरू डॉ. संजय सावंत यांचे आभार मानून त्यांना आत्मीयतेने भेटवस्तू दिली. यानिमित्ताने डॉ. संजय भावे यांनी विस्तार शिक्षण संचालनालयातर्फे व्यासपीठावर उपस्थित सर्व मान्यवरांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन भावपूर्ण सत्कार करीत कृतज्ञता व्यक्त केली.

याप्रसंगी मागील ५० वर्षात विद्यापीठातून पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या तसेच भारताबाहेर जाऊन नावलौकिक मिळविणाऱ्या माजी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. तसेच सुवर्णमहोत्सवी वर्षात आयोजित विविध क्रीडा स्पर्धांमधील विजेत्यांना तसेच विद्यापीठातील कर्मचारी तसेच त्यांच्या कुटुंबीयांसाठी आयोजित क्रीडा स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. यावेळी सर्वोत्कृष्ट महाविद्यालय म्हणून ' वनशास्त्र महाविद्यालय' व सर्वोत्कृष्ट विस्तार कार्य केल्याबद्दल ' कृषि विज्ञान केंद्र, रोहा' ची निवड करून त्यांना प्रत्येकी पाच लाख रुपये पारितोषिक देण्यात आले आहे. सर्वोत्कृष्ट संशोधन केंद्र म्हणून ' प्रादेशिक फळ संशोधन केंद्र वेंगुर्ले ' व ' कृषि संशोधन केंद्र, शिरगाव' यांना विभागून प्रत्येकी अडीच लाख रुपयांचे पारितोषिक देण्यात आले. तसेच मागील तीन वर्षात विद्यापीठाने जाहीर केलेल्या विविध पुरस्काराचे वितरण विजेत्यांना करण्यात आले. याप्रसंगी लाल बहादूर शास्त्री सोशल फोरम ऑफ महाराष्ट्रचे अध्यक्ष डॉ. रवींद्र मर्दाने,सुरवडचे प्रगतशील शेतकरी ज्ञानदेव मगर,अदित वराडे प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रमोद सावंत यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. प्रमोद बोरकर यांनी केले व आभार डॉ. भरत साळवी यांनी मानले.

# मुंबई-गोवा महामार्गाला दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकरांचेच नाव द्या

## तळा पत्रकार संघाचे तहसीलदारांना निवेदन

**दै.रायगड नगरी । तळा**

मुंबई गोवा महामार्गाला आद्य पत्रकार, दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचे नाव द्यावे या मागणीसाठी कोकणातील रायगड रत्नागिरी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील पत्रकारांनी निवेदन दिले जाणार असून आज तळा प्रेस क्लबने तळा तहसीलदार ए.एम् कनशेट्टी यांना याबाबत निवेदन दिले.

कोकणातील पत्रकारांनी एस.एम देशमुख यांच्या नेतृत्वाखाली २००६ पासून महामार्गाच्या चौपदरी करणासाठी सनदशीर मार्गाने लढा दिला होता. त्यासाठी दिल्ली वाऱ्या देखील केल्या गेल्या त्यानंतर २०१२ साली महामार्गाचे काम सुरू झाले. १९० वर्षांपुर्वी दर्पण हे नियतकालिक सुरू करून वृत्तपत्रांचा पाया घालणाऱ्या कै.बाळशास्त्री जांभेकर यांचे नाव महामार्गाला द्यावे अशी मागणी त्यातूनच पुढे आली. कै बाळशास्त्री जांभेकर कोकणातील तर होतेच त्याचबरोबर ते केवळ पत्रकारच नव्हते तर विचारवंत, समाजसुधारक, म्हणूनही त्यांचा नावलौकिक होता. अशा प्रतिभावंत पत्रकारांचे महामार्गास नाव देऊन आम्ही विचारवंतांची, पत्रकारांची देखील कदर करतो हे सरकारने जगाला दाखवून देत आहोत.


अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांच्या मार्गदर्शना खाली रायगडसह कोकणातील पत्रकारांनी सातत्यानं दहा वर्षे रस्त्यावर उतरून लढा दिला. महाराष्ट्रापासून दिल्लीपर्यंत पाठपुरावा केल्यानंतर महामार्गाच्या चौपदरी करणाचे काम सुरू झाले. काम रखडल्यानंतर देखील वेळोवेळी पत्रकारांनी पाठपुरावा केला होता. पत्रकार लढत होते तेव्हा सर्व राजकीय पक्ष मूग गिळून गप्प होते. मात्र आता रस्त्याचे काम पूर्णत्वास येत असताना अनेक नेते श्रेय लाटण्यासाठी समोर येत आहेत. तसेच काहींनी महामार्गासाठी वेगवेगळी नावं सूचवून मोडता घालण्याचा प्रयत्न सुरू केला आहे.



आद्य पत्रकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर हे कोकणचे सुपूत्र असून पत्रकारांमुळे हा महामार्ग होत असल्याने बाळशास्त्रींचे महामार्गाला नाव देणे योग्य असल्याने सरकारने तातडीने तसा निर्णय घ्यावा अशी मागणी कोकणातील सर्व पत्रकार करीत आहेत.

विविध प्रकल्पांना राजकीय नेत्यांची नावं दिली जात असतात. मुंबई - गोवा महामार्गाला एक पत्रकार, विचारवंत, समाजसुधारक असलेल्या बाळशास्त्रींचे नाव देऊन औचित्य साधावे अशी रास्त मागणी निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी तळा प्रेस क्लब अध्यक्ष संजय रिकामे उपाध्यक्ष किशोर पितळे जेष्ठ पत्रकार तथा सल्लागार पुरूषोत्तम मुळे उपस्थित होते.

# अनधिकृत बॅनर ठरतेय जीवघेणे ; अनधिकृत बॅनर हटविण्याची मागणी



**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यात अनेक ठिकाणी अनधिकृत बॅनर बाजी सुरु आहे. विविध शैक्षणिक संस्था, इतर उद्योग संस्था या आपल्या जाहिराती करण्यासाठी आपले बॅनर परवानगी न घेता कुठेही लावत आहेत. ज्या ठिकाणी परवानगी नाही अशा ठिकाणीही अनधिकृत बॅनर मोठ्या प्रमाणात लावले जात आहेत. अश्या बॅनर मुळे एखाद्याचा अपघात होऊ शकतो किंवा मृत्यू सुद्धा होऊ शकतो. मात्र या घटनेकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे.

उरण तालुक्यातील उरण पनवेल मुख्य रस्त्यावर फुंडे बस स्टॉप येथे रस्त्यावरून लोखंडी पाईप लाईन गेली आहे. या लोखंडी पाईप लाईन खालून सर्व वाहने ये जा करीत असतात. या ठिकाणी अनेक बॅनर लावलेले दिसतात.उरण मधील द्रोणागिरी नोड येथे राहणारे अतुल शेलार यांच्या अंगावर हे बॅनर पडणार होते अचानक त्यांनी आपले बाईक वेगाने चालवून आपला जीव वाचवीला. नाहीतर बॅनर अंगावर पडून त्यांचा अपघात निश्चित होता.

वाहन चालवीताना वाहन चालक सरळ पुढे बघून वाहन चालवीत असतात. डोक्याच्या वरती असलेल्या पुलाकडे कोणीही लक्ष देत नाही.अचानक वरून पडणारे लाकडी बॅनर एखाद्याचे जीव घेऊ शकते. अधून मधून वादळवारा सुटत असतो त्यामुळे अपघात होण्याचा जास्त धोका संभवतो. त्यामुळे त्या अगोदरच काळजी घेतलेली बरे या उद्देशाने अनधिकृत बॅनर हटवून टाकावे. परवानगी असलेल्या ठिकाणीच बॅनर लावावेत अशी मागणी उरण द्रोणागिरी येथील रहिवाशी अतुल शेलार यांनी केली आहे.

# शारलोट लेकचा गाळ काढण्यास सुरुवात



**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरानला वेळेनुसार पाणीपुरवठा करणाऱ्या शारलोट तलावाची स्वच्छता मोहीम नुकताच दि.१९ पासून नगरपरिषदेच्या माध्यमातून घेण्यात आली आहे. अनेक वर्षे या तलावातील गाळ काढण्यात आला नव्हता त्यामुळे गेल्या वर्षी निविदेद्वारे याबाबत प्रसिद्धी देण्यात आली होती परंतु कोरोना काळामुळे ही कामे पूर्ण करता आली नाहीत. याकामी नगरपरिषदेच्या प्रशासक सुरेखा भणगे यांनी मागील आठवड्यात संबंधीत ठेकेदारांना कार्यदेश देऊन कामाला सुरुवात करण्यात आली आहे.

माथेरान मध्ये नेरळ येथील उल्हास नदीतून वाढीव पाणीपुरवठा होत असतो परंतु अनेकदा वीजप्रवाह खंडित झाल्यावर शारलोट तलावातून पाण्याचा उपसा केला जात आहे. पन्नास फूट खोल असणाऱ्या या तलावात काही वर्षांपासून मोठया प्रमाणावर मातीचा गाळ साठलेला आहे.१५ जून पर्यंत गाळ काढल्या नंतर इथे पाण्याची पातळी वाढून मुबलक पाणी साठा होणार असल्याचे नगरपरिषदेच्या प्रशासक सुरेखा भणगे यांनी सांगितले.

# इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर वेल्फेअर असोसिएशनच्या जिल्हाध्यक्ष पदी निलेश पाटील यांची निवड

**दै.रायगड नगरी । पेण**

इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर वेल्फेअर असोसिएशनच्या रायगड जिल्हा अध्यक्ष पदी निलेश पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली. इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर वेल्फेअर असोसिएशन संघटनेची निवडणूक चौक, खालापूर येथे पार पडली. यावेळी संपूर्ण रायगड जिल्ह्यातून इलेक्ट्रिकलची कामे करणारी असंख्य कॉन्ट्रॅक्टर निवडणुकीस उपस्थित होते.

रायगड जिल्हा संघटनेचे ज्येष्ठ नेते राजेश सानप व माजी अध्यक्ष किरण बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या निवडणुकीत महावितरणच्या पेण सर्कल अंतर्गत असलेल्या इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर्स संघटनेच्या रायगड जिल्हा अध्यक्ष पदी निलेश शरद पाटील यांची एकमताने निवड करण्यात आली. तर जिल्ह्यातील चार डिव्हिजन मधून पेणचे धनंजय पाटील, रोह्याचे दादासाहेब धुमाळ, खोपोलीचे जंगम व अभिजीत जाधव यांची जिल्हा उपाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. तर सचिव पदी कर्जतचे भालचंद्र जोशी व खजिनदार पदी दिनेश पाटील यांची निवड करण्यात आली.

संघटनेचे ज्येष्ठ सभासद राजेश सानप यांची कार्याध्यक्ष पदी निवड करण्यात आली. यावेळी इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर वेल्फेअर असोसिएशन रायगड जिल्हाध्यक्ष निलेश पाटील यांनी बोलताना सांगितले की, रायगड जिल्ह्यातील इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर्सना भेडसावणारे विविध प्रश्न लवकरात लवकर सोडविण्यात येतील. तसेच महावितरण कडून होणाऱ्या कॉस्ट डाटा संबंधीच्या दिरंगाई बद्दल त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत भविष्यात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही दिला.



दरम्यान झालेल्या मिटिंग वेळी संघटनेचे माजी अध्यक्ष किरण बोरसे यांची फेडरेशन ऑफ इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर्स ऑफ महाराष्ट्रच्या राज्य उपाध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल त्यांचाही सत्कार करण्यात आला. सदर निवडणुकीवेळी संपूर्ण रायगड जिल्ह्यातून इलेक्ट्रिकलची कामे करणारी असंख्य कॉन्ट्रॅक्टर उपस्थित होते.

# पनवेल महानगरपालिका

## ता.पनवेल, जि.रायगड, पनवेल-४१०२०६

## जाहीर प्रकटन

पनवेल महानगरपालिका हद्दीतील सर्व रहिवासी मिळकत धारकांना या जाहीर प्रकटनद्वारे कळविण्यात येते की, प्रभाग समिती ब-०५, प्रभाग समिती क-०७, प्रभागत समिती ड-२२ असे एकूण ३४ अतिधोकादायक इमारतीतील रहिवाशांनी जिवीत व वित्तीयहानी टाळण्यासाठी अशा इमारतीमध्ये किंवा मिळकतीमध्ये कोणतेही वास्तव्य करू नये.

अशा प्रकारचे अतिधोकादायक बांधकामे पडून हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा प्रकारे सोबत यादी नुसार एकूण ३४ अतिधोकादायक इमारती / बांधकामे संबंधितांनी अशा धोकादायक इमारती / बांधकामे तात्काळ रिकामी करून अशी बांधकामे तात्काळ पाडून / उतरवून घ्यावीत अन्यथा अशा धोकादायक इमारती कोणत्याही प्रकारची जिवीत वा वित्तीयहानी झाल्यास त्यास संबंधित घरमालक / भोगवटादार हे जबाबदार राहतील याबाबतीत महानगरपालिका जबाबदार राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

(सोबत प्रभाग निहाय यादी)

**सही/-**
**(गणेश देशमुख)**
**आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

पमपा/अ.बां.नि./२४२२/प्र.क्र.०१/जाक्र.४४/२०२२
दिनांक : ०६/०५/२०२२

**पनवेल महानगरपालिका**
**प्रभाग समिती-ब**
**प्रभाग अधिकारी यांचे नाव : श्री.सदाशिव कवठे**
**धोकादायक इमारतींची माहिती**

| अ.क्र. | सोसायटीचे नाव | पुर्ण पत्ता |
|---|---|---|
| १ | गणेश सुदाम गायकवाड | प्लॉट नं.बी-५०, सेक्टर ०४ बी, आसुडगाव, नवीन पनवेल |
| २ | अनिल एस निंबार्गी | प्लॉट नं.०९, रोड नं.१०, सेक्टर ०१, नवीन पनवेल |
| ३ | रवींद्र सिंह गुप्ता | प्लॉट नं.१७, रोड नं.१०, सेक्टर ०१, नवीन पनवेल |
| ४ | आदित्य को ऑप.सोसायटी | प्लाट क्र.सी-०३, सेक्टर ४, आसुडगाव, नवीन पनवेल |

**पनवेल महानगरपालिका**
**प्रभाग समिती-क**
**प्रभाग अधिकारी यांचे नाव : श्री.अरविंद पाटील**
**धोकादायक इमारतींची माहिती**

| अ.क्र. | सोसायटीचे नाव | पुर्ण पत्ता |
|---|---|---|
| १ | ब्लु हेवन सोसायटी | प्लॉट नं.८ अ,से.३५, कामोठे |
| २ | अमन को.ऑ.हौ.सोसा. | बुशरा पार्क, प्लॉट नं.५२४/७,८,९ बावन बंगला |
| ३ | गुरुकुल सोसायटी | प्लॉट नं.४६, आदर्श सोसायटी बावन बंगला |
| ४ | न्यू मधुबन सोसा | प्लॉट नं.५३५ ए, ठाणा नाका |
| ५ | चैत्रबन बिल्डींग | प्लॉट नं.२१अ/१, सब प्लॉट नं.०२, उगम नगर जुना ठाणा नाका रोड |
| ६ | श्री पुरुषोत्तम सोसायटी | आदर्श, प्लॉट नं.२२, बावन बंगला, पनवेल |
| ७ | त्रिवेणी सोसायटी | प्लॉट नं.५१८, बंदर रोड, पनवेल |

**पनवेल महानगरपालिका**
**प्रभाग समिती-ड**
**प्रभाग अधिकारी यांचे नाव : श्री.अमर पाटील**
**धोकादायक इमारतींची माहिती**

| अ.क्र. | सोसायटीचे नाव | पुर्ण पत्ता |
|---|---|---|
| १ | सहकार को.ऑप.हौ.सोसायटी | भूखंड क्र.७४/३ व ७४/४ पनवेल |
| २ | तेजल को.ऑप.हौ.सोसायटी | भूखंड क्र.८३, पनवेल |
| ३ | | भूखंड क्र.११६७ ए, मिरची गल्ली, पनवेल |
| ४ | अक्षय सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. | भूखंड क्र.६२८, पनवेल |
| ५ | संत साई कृपा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. | भूखंड क्र.३९०, पनवेल |
| ६ | कार्लेकर निवास | अ.भू.क्र.१४९, १८७ ब, लाईन आळी, पनवेल |
| ७ | त्रिमुर्ती अपार्टमेंट | अ.भू.क्र.१६४, १६५, लाईन आळी, पनवेल-४१०२०६ |
| ८ | प्रसाद | अ.भू.क्र.२०५/४५, प्लॉट नं.९७, मिडल क्लास हौ. सोसा. ४१०२०६ |
| ९ | पुष्पा अपार्टमेंट | अ.भू.क्र.६१/३, जुना ठाणा नाका रोड, पनवेल |
| १० | | सी.टी.एस.नं.८२७ बी, एम.जी.रोड, पनवेल |
| ११ | स्वप्न रेखा को.ऑप.हौ.सोसायटी | प्लॉट नं.६२, सब प्लॉट नं.०५, पनवेल |
| १२ | योगेश्वर प्रसाद | प्लॉट नं.६०३, अ/२, स्वामी नित्यानंद मार्ग, पनवेल |
| १३ | | पी.एल.०६-०९, ते पी.एल.०६-२१ ते पी.एल.०६-२३ सेक्टर १७, नवीन पनवेल |
| १४ | तुलसी अपार्टमेंट | प्लॉट नं.२९/१ ए, जुना ठाणा नाका रोड, पनवेल |
| १५ | श्रीनाथ कृपा को.ऑप.हौसिंग सोसायटी | प्लॉट नं.२३०/४, टेलिफोन एक्सेजच्या मागे, पनवेल-४१०२०६ |
| १६ | श्रीनाथ दर्शन को.ऑप.हौसिंग सोसायटी | प्लॉट नं.२३०/३, टेलिफोन एक्सेजच्या मागे, पनवेल-४१०२०६ |
| १७ | सनफ्लावर को.ऑप.हौ.सोसायटी | रुपाली सिनेमा जवळ, प्लॉट नं.२२६, पनवेल |
| १८ | श्री कुटीर को.ऑप.हौसिंग सोसायटी | फा.प्लॉट नं.१२७/६, नाडकर्णी हॉस्पिटलच्या बाजूला, लाईन आळी, पनवेल-४१०२०६ |
| १९ | श्री राधाकृष्ण मंदिर | सि.टी.एस.नं.४६०, जय भारत नाका, टिळक रोड, पनवेल-४१०२०६ |
| २० | | प्लॉट नं.११, रोड नं.०४, सेक्टर-१९, नवीन पनवेल |
| २१ | सुशिला निवास | फा.प्लॉट नं.२०५/८८, प्लॉट नं.८३, मिडलक्लास सोसायटी, पनवेल-४१०२०६ |
| २२ | साई कुंज को.ऑप.हौ.सोसायटी | आदर्श सोसायटी, बावन बंगला रोड, पनवेल |
| २३ | संकल्प सिद्धी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित | सर्व्हे नं.६०३, टिळक रोड, पनवेल |
| २४ | निमित पार्क को.ऑप.हौ.सोसायटी | प्लॉट नं.१०८/२, कफ नगर, पनवेल |
| २५ | द्वारका को.ऑप.हौ.सोसायटी लि. | १५६० ए, सिटी स्टोअर्स मागे, शिवाजी रोड, पनवेल |
| २६ | | प्लॉट नं.०९, रोड नं.१६, सेक्टर-१९, नवीन पनवेल |
| २७ | अनुपम सहकारी गृहनिर्माण संस्था | प्लॉट नं.७९, स्वामी नित्यानंद रोड, पनवेल |
| २८ | रिद्धी सिद्धी को.ऑप.हौ.सोसायटी लि. | प्लॉट नं.७२ ए, एस.एन.रोड, सारस्वत बँक जवळ, पनवेल |
| २९ | कोकण एज्युकेशन सोसायटी | विद्या संकुल, फा.प्लॉट नं.१२८, १२७/१, १२७/२, पनवेल |
| ३० | मुमताज अपार्टमेंट | सिटी सर्व्हे नं.४१५, भुसार मोहल्ला, पनवेल |
| ३१ | श्री समर्थ कृपा को.ऑप.हौ.सोसा.लि. | प्लॉट नं.१३६६ बी, प्रभु आळी, पनवेल |
| ३२ | श्री गुरु आशिष को.ऑप.हौ.सोसायटी | सि.टी.एस.नं.६६२/ए, ६६२/बी, १, ६६२/बी/२, पनवेल |

# संक्षिप्त...

## मुठवली खु.येथे विद्युत घंटेची भेट

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुक्यातील मुठवली खु.या गावातील भवानी माता मंदिरात दैनंदिन आरतीसाठी विद्युतघंटा भेट देण्याचा कार्यक्रम संपन्न करण्यात आला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे युवक अध्यक्ष जयवंत मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त जयवंत मुंडे आणि त्यांच्या परिवाराचे वतीने सदर विद्युतघंटा मंदिरास भेट देण्यात आली आहे. यावेळी मुठवली खु.ग्रामस्थ व तरुण मंडळाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.तर उपस्थित ग्रामस्थ आणि तरुण मंडळाचे कार्यकर्ते यांनी युवक अध्यक्ष जयवंत मुंडे यांचा वाढदिवस केक कापून व दीपप्रज्वलन करून साजरा करून त्यांनी मंदिरातील आरतीसाठी विद्युतघंटा दिल्याने ग्रामस्थांनी त्यांचे विशेष आभार व्यक्त करून त्यांना शुभेच्छा दिल्या तसेच यानिमित्ताने छत्रपती शिवरायांची फ्रेम भेट देऊन त्यांच्याप्रती क्रुतज्ञतापूर्वक भाव व्यक्त केला.

## पहिली राज्यस्तरीय पॅरा कब्बडी चॅम्पियनशिप स्पर्धा गडब पेण येथे होणार

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

ऑल स्पोर्ट्स असोसिएशन फॉर द डिसेबल्ड महाराष्ट्र आयोजित आणि सहकार्य अपंग कल्याणकारी संस्था रायगड महाराष्ट्र, कुलाबा दिव्यांग क्रीडा असोसिएशन नवी मुंबई व कालंबादेवी युवक मंडळ गडब पेण यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्ह्यातील गडब पेण येथे पहिली राज्यस्तरीय पॅरा कब्बडी चॅम्पियनशिप स्पर्धा२०२२ या स्पर्धेचे आयोजन रविवार दिनांक २२ मे २०२२ रोजी करण्यात आले आहे. या स्पर्धेत मुंबई, कोल्हापूर,मुंबई उपनगर, रायगड, ठाणे, सांगली, नवी मुंबई, नाशिक या सहा संघाचा समावेश असणार आहे. रायगड पॅरा कबड्डी संघात ओमकार महाडीक माणगाव, अक्षय निकम रोहा,राजा मोकल पेण मुकुल खाडे पेण,हेमंत मोरे रोहा,महेश वसावे नंदुरबार,जयेश पाटील पेण निखिल बडे माणगाव यांची निवड करण्यात आली आहे तर कर्णधार म्हणुन रमेश संकपाल कर्जत, प्रशिक्षक म्हणून गणेश पाटील पेण व व्यवस्थापक म्हणून शिवाजी पाटील रोहा यांची नियुक्ती करण्यात आली तसेच नवी मुंबई पॅरा कबड्डी संघात कर्णधार म्हणुन मंगेश म्हात्रे पेण तसेच उमाजी जाधव रोहा, अनिल जाधव महाड, शैलेश शिंदे पेण, सुनिल खरात या रायगड जिल्ह्यातील दिव्यांग कब्बडी खेळाडूंची निवड करण्यात आली. तसेच नवीमुंबई संघात चांगदेव शिरतर पुणे, रायसिंग वसावे नंदुरबार, सागर आईनकर रत्नागिरी, इच्छाराम केळुसकर सिंधुदुर्ग, यश शरमकर मुंबई याचीही निवड नवीमुंबई संघात करण्यात आली आहे असे ऑल स्पोर्ट्स असोसिएशन फॉर द डिसेबल्डचे अध्यक्ष व सहकार्य अपंग कल्याणकारी संस्था रायगड महाराष्ट्र चे सचिव शिवाजी पाटील यांनी माहिती दिली.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# सडवली फाट्यावरून चोळई नदीचा पूर पोलादपूरच्या अंडरपासमध्ये शिरल्यास मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग होणार ठप्प

## अंडरपास बुजवून तातडीने उड्डाणपूल बांधण्याची गरज



**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

शहराच्या जमिनीखालून अंडरपास जाणाऱ्या मुंबई ते गोवा राष्ट्रीय महामार्गामध्ये तांबडभुवनपासून काही अंतरावर असलेल्या सडवली फाट्याजवळील चोळई नदीच्या पुराचे पाणी शिरल्यास संपूर्ण अंडरपास पाण्याने तुंबून मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग ठप्प होण्याचे संकेत गेल्या वर्षीपासून मिळत असताना यंदाच्या एकूणच अंडरपासमधील नियोजनशून्य महामार्ग बांधकामाचे स्वरूप पाहता अंडरपास तातडीने बुजवून उड्डाणपूल बांधण्याची गरज निर्माण होणार आहे.

पोलादपूर एस.टी.स्थानकासमोरील भूसंपादन ६० मीटर्स अपेक्षित असताना केवळ ४५ मीटर्स करण्यात आले आहे. यात दोन्ही बाजूंच्या सेवा रस्ते म्हणजे सर्व्हिस रोडसाठी ७.५ मीटर्स रूंदी अपेक्षित असून अंडरपास बॉक्स कटींगवर व्हेईक्युलर ओव्हर ब्रिज मंजूर आराखड्यात केवळ एक असताना पोलादपूर एस.टी.स्थानक परिसरामध्ये तसेच संध्यारात्री तीर्थक्षेत्रापर्यंत जाण्याची सोय होण्यासाठी तब्बल चार व्हेईक्युलर ओव्हर ब्रिजचे काम सुरू करण्यात आले आहे. राष्ट्रीय महामार्गाने याठिकाणी ४५ मीटर रूंदीचे भूसंपादन होणार असताना याचठिकाणी सुमारे ३० ते ३५ फूट खोल अंडरपास बॉक्स कटींग करून तेवढ्याच अंतरात अंडरपासमध्ये चारपदरी महामार्ग आणि वरल बाजूला एकाबाजूने गटारसदृश्य फूटपाथ असलेले पूर्वेकडील आणि पश्चिमेकडील असे दोन सर्व्हिसरोड केले जात आहेत. त्यामुळे सर्व्हिसरोडची रूंदी अपेक्षेपेक्षा कमी होत असून अंडरपासमधून जाणाऱ्या चारपदरी महामार्गाच्या दुतर्फा, वरील बाजूस असलेल्या सर्व्हिसरोडवरून कोसळणाऱ्या पाण्याचा निचरा होण्याची कोणतीही तरतूद नसल्याने अंडरपासमधील महामार्गावर पडणारे पावसाचे पाणी बॉक्सकटींगमध्ये जिरून आता त्याठिकाणी असलेले स्टीलच्या जाळीवरील सिमेंट काँक्रीट फोमचे फवारे लालमातीच्या ढिगाऱ्यांसोबत कोसळू लागले आ-हेत. मात्र, राष्ट्रीय महामार्ग बांधकाम विभागाला ही वस्तुस्थिती दूर्लक्षित करावीशी वाटली तरी तांबडभुवनपासून शे-दोनशे मीटर्स अंतरावर सडवली फाट्यावरील चोळई नदीचे पात्र दुथडी भरून वाहू लागले की त्या पाण्याचा प्रवाह थेट अंडरपासमधील मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाला मानवनिर्मित नवीन नदीचा प्रवाह म्हणून मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग ठप्प करण्यास कारणीभूत ठरणार आहे.

पोलादपूरच्या पश्चिमेकडील सर्व्हिसरोड आणि त्यावरील ड्रेनेज कम फूटपाथचे काम अद्याप सुरू झाले नसून त्या सर्व्हिसरोडची रूंदी ७.५० मीटर्स तर लांबी १०८० मीटर्स तर ड्रेनेज कम फूटपाथची रूंदी १.५ मीटर्स असल्याचे राष्ट्रीय महामार्गाच्या अंतिम आराखड्यामध्ये नमूद करण्यात आले नाही.

पोलादपूर शहरातील ग्रामीण रूग्णालयासह पार्टेकोंडपर्यंत सर्व्हिसरोड व ड्रेनेज कम फुटपाथ असूनही अद्याप तो एस.टी.स्थानकासमोरच रेंगाळल्याने चौपदरीकरणाचे पोलादपूर शहरात अरूंदीकरण होत असल्याची चिन्हे दिसून येत आहेत. याउलट, पोलादपूरच्या पूर्वेकडील सर्व्हिस रोडची रूंदी ७.५० मीटर्स तर लांबी ८५० मीटर्स तर ड्रेनेज कम फूटपाथची रूंदी १.५ मीटर्स असूनही हा रस्ता सद्यस्थितीत वाहतुकीस सुरू राहिल्याने मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग सुरू आहे. त्यासमोरील पश्चिमेकडील सर्व्हिसरोड अद्याप वाहतुकीस योग्य करण्यात आला नसल्याने संपूर्ण वाहतूक पूर्वेकडील सर्व्हिसरोडच्या एकाच बाजूने सुरू आहे. पोलादपूर ग्रामीण रूग्णालयासह पार्टेकोंडपर्यंतचा सर्व्हिसरोड होण्यास अडथळा करणाऱ्या बाधितांना पोलादपूर शहराचा नकाशाच विस्कटून टाकायचा असल्यास प्रशासन आणि महामार्ग बांधकाम विभागासह मोजक्याच बाधितांचे हित जोपासणाऱ्या एलॲण्डटी ठेकेदार कंपनीला पोलादपूरकरांनी जाब विचारण्याची गरज निर्माण झाली आहे.

तांबडभुवन येथील अंडरपासमधील काँक्रीट रस्त्यावर ठेवलेल्या रूग्णवाहिकेभोवती पुराचे पाणी साचल्याचे तसेच पंचायत समितीसमोर एलॲण्डटी ठेकेदार कंपनीचाच डम्पर अंडरपासमधून जाणाऱ्या नियोजित महामार्गावर कोसळल्याने या अंडरपासमधून जाणाऱ्या मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाचा धोका भविष्यात स्पष्ट दिसून येत असल्याने या अंडरपास महामार्गावर केवळ व्हेईक्युलर ओव्हरब्रिज बांधण्याऐवजी संपूर्ण अंडरपास बुजवून पोलादपूर शहरात उड्डाणपूल उभारण्याचा निर्णय केंद्रीय भुपृष्ठवाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी तातडीने घेतल्यास चिमूटभर बाधितांच्या लांगूलचालनासाठी संपूर्ण पोलादपूरची फाळणी घडविण्याचा अन् दीर्घकाळासाठी गैरसोयीचा ठरणारा अंडरपासचा अनपेक्षित पर्याय कायमचा बाद होऊ शकणार असल्याने पोलादपूर तालुक्याने येत्या पावसाळ्यात सडवली पुलाखालून चोळई नदीचे पात्र अंडरपासच्या महामार्गावर आल्यानंतर मोठ्या प्रमाणात आक्रमक आंदोलन करण्याची गरज निर्माण झाली आहे.

# आ.प्रशांत ठाकूर यांच्या स्थानिक विकास निधीतून चिंचवलीत रस्ते

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आणि पनवेलचे कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली तालुक्यात अनेक विकासकामे सुरू असून ती पूर्णत्वास येत आहेत. त्या अनुषंगाने स्थानिक आमदार निधीतून चिंचवली येथे डांबरीकरण झालेल्या एका रस्त्याचे लोकार्पण आणि दुसऱ्या रस्त्याच्या काँक्रिटीकरणाच्या कामाचा भूमिपूजन सोहळा बुधवारी आयोजित करण्यात आला होता. सुमारे १८ लाख रुपयांच्या या विकासकामांचा शुभारंभ आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाला.

पनवेल तालुक्यातील चिंचवली ते भानघर या रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम आमदार प्रशांत ठाकूर यांच्या स्थानिक आमदार निधीमधून १० लाख रुपये खर्चून करण्यात आले असून हे काम पूर्ण झाले आहे तसेच आठ लाख रुपयांचा निधी वापरून चिं-चवली बसथांबा ते श्रीराम मंदिरापर्यंतच्या रस्त्याचे काँक्रिटीकरण करण्यात येणार आहे. या रस्त्यांच्या डांबरीकरणाचे लोकार्पण व काँक्रिटीकरणाच्या कामाचे भूमिपूजन उत्साहात झाले.

या शुभारंभावेळी भाजप तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, दुंदरे ग्रामपंचायतीच्या उपसरपंच नीराबाई चौधरी, माजी उपसरपंच रमेश पाटील, चंद्रा पाटील, भानघरचे सरपंच शांताराम पोपेटा, सुनील पाटील, सदस्य अनुराधा वाघमारे, दर्शना चौधरी, मंगला उसाटकर, रमेश पाटील, किशोर पाटील, गजानन पाटील, आत्माराम गवणे, मंगल पाटील, बामा शेळके, प्रकाश शेळके, तुकाराम म्हस्कर, नामदेव डुकरे, समीर गवळी, मयुर तांबडे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.यावेळी माजी उपसरपंच रमेश पाटील यांनी, आमच्या गावाच्या विकासासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी खूप मोठे योगदान दिले, असे सांगून त्यांचे आभार मानले.



# आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह पनवेलची यंत्रणा अद्ययावत करण्याची गरज



**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्राची अस्मिता जपण्यासाठी व पनवेलकरांना करमणुकीचे दालन उपल्ब्ध करुन देण्यासाठी, आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाची निर्मिती करण्यात आली आहे.वासुदेव बळवंत फडके यांच्या सारख्या आद्यक्रांतिकारक पनवेल भूमीत जन्मल्याने त्यांचे नाव या नाट्यगृहाला देण्यात आले आहे. विशेष म्हणजे नाट्यरसिकांना मुंबई उपनगरा ऐवजी पनवेल मध्ये हक्काची अशी जागा तत्कालीन नागपरिषदेने नाट्यगृहाच्या रूपाने उपलब्ध करून दिली आहे. पनवेल महानगरपालिकेच्या अखत्यारीत येणाऱ्या या नाट्यगृहात सध्याच्या घडीला नाटकांसह पनवेल महानगरपालिकेच्या महासभा, विविध बैठका, सामाजिक सांस्कृतिक कार्यक्रम पार पाडत असतात.नाट्यगृहाला अधिक अद्ययावत बनविण्याची गरज सध्याच्या घडीला आहे.

फडके नाट्यगृहाची आसनव्यवस्था ६६५ एवढी आहे. या व्यतिरिक्त ४ ग्रीन रूम, १ रिहर्सल हॉल, एका व्हीआयपी रूमचा समावेश आहे. फडके नाट्यगृहात समस्यांबाबत चर्चा केल्यास सध्याच्या घडीला स्वच्छता गृहातील यंत्रणा, प्लम्बिंग, मोडकळीस आलेले नळ हि महत्वाची समस्या पहावयास मिळत आहे. मेकअप रूमची दुरावस्थे बाबत अनेक अभिनेते नाराजी व्यक्त करत असतात.विशेष म्हणजे फडके नाट्यगृहाला अधिक अद्ययावत करण्याची गरज आज आहे. यामध्ये पीट, साऊंड यंत्रणा, नाट्यगृहाबाहेर डिजिटल स्क्रीन आदीं बाबत पालिका प्रशासनाने नाविन्यपूर्ण बदल करण्याची गरज आहे. पालिकेचे मुख्यालय अद्याप तयार झाले नसल्याने पालिकेच्या महासभा पाच वर्षापासुन नाट्यगृहातच पार पडत असतात. त्यामुळे पालिका अधिकारी, लोकप्रतिनिधी नगरसेवकांची किमान प्रत्येक महिन्याला याठिकाणी फेरी होत असल्याने इतर नाट्यगृहांच्या तुलनेत फडके नाट्यगृहाचे व्यवस्थापन उत्तम राखले जात आहे. नाट्यगृहाला ग्रीन एनर्जीने जोडण्याकरिता नाट्यगृहात सोलर सिस्टम लवकरच कार्यान्वित केली जाणार असल्याची माहिती नाट्यगृहाचे व्यवस्थापक राजेश डोंगरे यांनी दिली.

नाट्यगृहात शनिवार, रविवारी किमान दोन दोन प्रयोग होत असतात.या व्यतिरिक्त इतर कार्यक्रम यामध्ये शासकीय, सांस्कृतिक कार्यक्रमांचा समावेश आहे. ऑनलाईन बुकिंगची व्यवस्था पालिकेने कार्यान्वित केली आहे.

# मुंबई-गोवा महामार्गाला दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकरांचेच नाव द्या ; रोहे प्रेस क्लबचे प्रांताधिकारी व तहसिलदारांना निवेदन

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

मुंबई गोवा महामार्गाला आद्य पत्रकार, दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचे नाव द्यावे या मागणीसाठी कोकणातील सर्व तालुक्यातील पत्रकारांनी निवेदन दिले या पार्श्वभूमीवर रोहा तालुक्यातील पत्रकारांनी रोहा तहसीलदार व प्रांत अधिकारी यांना याबाबतचे निवेदन दिले.




अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली रायगडसह कोकणातील पत्रकारांनी सातत्यानं दहा वर्षे रस्त्यावर उतरून मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचा लढा दिला आहे.तर महाराष्ट्रापासून दिल्लीपर्यंत पाठपुरावा केल्यानंतर महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम सुरू झाले. काम रखडल्यानंतर देखील वेळोवेळी पत्रकारांनी पाठपुरावा केला होता.

पत्रकार लढत होते तेव्हा सर्व राजकीय पक्ष मूग गिळून गप्प होते. मात्र आता रस्त्याचे काम पूर्णत्वास येत असताना अनेक नेते श्रेय लाटण्यासाठी समोर येत आहेत. तसेच काहींनी महामार्गासाठी वेगवेगळी नावं सूचवून मोडता घालण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. आद्य पत्रकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर हे कोकणचे सुपूत्र आहेत. पत्रकारांमुळे हा महामार्ग होत असल्याने बाळशास्त्रींचे महामार्गाला नाव देणे औचित्यपूर्ण ठरणार असल्याने सरकारने तातडीने तसा निर्णय घ्यावा अशी मागणी कोकणातील सर्व पत्रकार करीत आहेत. विविध प्रकल्पांना राजकीय नेत्यांची नावं दिली जात असतात. मुंबई - गोवा महामार्गाला एक पत्रकार, विचारवंत, समाजसुधारक असलेल्या बाळशास्त्रींचे नाव देऊन औचित्य साधावे अशी भावना राज्यातील पत्रकारांची आहे

मुंबई - गोवा महामार्गाला बाळशास्त्री जांभेकर यांचे नाव द्यावे या मागणीसाठी कोकणातल्या रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या तीनही जिल्ह्यातील पत्रकारांनी तालुका पातळीवर तहसिलदारांना निवेदनं दिले. अशाच प्रकारचे निवेदन रोहे तहसीलदार कविता जाधव यांना रोहा प्रेस क्लबचे मार्गदर्शक मिलिंद अष्टिवकर व अध्यक्ष शशिकांत मोरे यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आले. यावेळी सल्लागार राजेंद्र जाधव, सुहास खरिवले, कार्याध्यक्ष रामनरेश कुशवाह, उपाध्यक्ष अल्ताफ चोरडेकर, सेक्रेटरी नंदकुमार मरवडे, सहसेक्रेटरी कल्पेश पवार, सदस्य जुगल दवे, विश्वजित लुमण,अंजूम शेट्ये,शरद जाधव,उद्धव अव्हाड आदीं पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मोरा जेट्टीच्या शौचालयाची दुरवस्था ; नागरिकांमध्ये नाराजी



**दै.रायगड नगरी । उरण**

उरण येथील मोरा जेट्टीच्या शौचालयाची ही मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे. मात्र त्याकडे मेरी टाइम बोर्डचे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याने प्रवाशामध्ये वर्गात नाराजीचा सूर उमटत आहे. मेरीटाइम बोर्ड ने या समस्यांकडे जातीने लक्ष द्यावे अशी मागणी प्रवासी विशेष करुन महिला वर्ग करीत आहे. मुंबई व घारापुरी बेटावर जाण्यासाठी मोरा जेटीचा वापर सर्रास प्रवाशी नागरीक करत आहेत. येणाऱ्या जाणाऱ्या प्रवाशांसाठी मोरा जेटीवर मेरिटाइम बोर्ड मार्फत ज्या सुख सोयी असायला हव्या आहेत. त्या दिल्या जात नाहीत. विशेष म्हणजे मुख्य गोष्ट शौचालय चांगल्या प्रकारे असायला आहे. परंतु मोरा जेटीवर असे काहीच दिसत नाही. मोरा ते भाऊचा धक्का प्रवासात विशेष करुन ५० टक्के महिला वर्ग प्रवास करीत आहेत. मात्र जेटीवर शौचालय ची दुरवस्था झाली असून दरवाजे ही मोडक्या अवस्थेत आहेत. यामुळे विशेष म्हणजे महिला वर्गाला याचा खूप त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे लवकरात लवकर या समस्येकडे लक्ष द्यावे अशी मागणी महिला वर्ग करीत आहेत.

# गाडी विक्रीची जाहिरात देऊन फसवणूक करणाऱ्या सायबर चोरट्याचा शोध सुरु


**दै.रायगड नगरी । पनवेल**

ओएलएक्सवर स्कुटीच्या विक्रीची जाहिरात देऊन एका सायबर चोरटयाने खारघरमध्ये राहणाऱ्या एका महाविद्यालयीन तरुणाकडुन ऑनलाईन ४९,६९० रुपये उकळून त्याची फसवणुक केल्याचे उघडकीस आले आहे. खारघर पोलिसांनी या प्रकरणातील सायबर चोरटयाविरोधात फसवणुकीसह आयटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरु केला आहे.

या प्रकरणात फसवणुक झालेला विद्यार्थी यासीर अब्दुल्ला हुनेरकर (२२) हा खारघर सेक्टर-३४ मध्ये राहण्यास असून सध्या तो एमबीएचे शिक्षण घेत आहे. यासीरला वापरासाठी दुचाकी गाडी घ्यायची असल्याने तो सेकंडहँड दुचाकीचा शोध घेत होता. यादरम्यान,त्याला ओएलएक्सवर होंडा ॲक्टीवा विक्रीसाठी उपलब्ध असल्याची जाहिरात निदर्शनास आली. त्यामुळे यासीर याने जाहिरातीत असलेल्या गाडीचा मालक टोपासिंग चौहान याला संपर्क साधुन ॲक्टीवाच्या आरसी बुकची मागणी केली असता, त्याने यासीरच्या व्हॉट्सॲपवर आरसी बुक व गाडीचे फोटो तसेच स्वतःचे सीआयएसएफचे ओळखपत्र पाठवून दिले. यावेळी भामटया टोपासिंग याने तो सीआयएसएफमध्ये कॉन्स्टेबल असल्याचे तसेच त्याची बदली होणार असल्याने तो गाडी विकत असल्याचे यासीरला सांगितले.

या दोघांमध्ये स्कुटी खरेदी विक्रीचा व्यवहार ४९,६९० रुपयांमध्ये ठरल्यानंतर भामटया टोपासिंग याने त्याला गुगल पेद्वारे पैसे पाठविण्यास सांगून त्याला क्युआर कोड पाठवुन दिला. यासीरने त्याला पैसे पाठवुन दिल्यानंतर भामटया टोपासिंग याने कुरीयरद्वारे गाडी पाठविण्याचा बहाणा करुन त्याला कुरीयर चालकाचा नंबर दिला. त्यानंतर भामटया टोपासिंग याने यासीरला इन्शुरन्सचे २२ हजार रुपये जमा करण्यास सांगितल्याने त्याला संशय आला. त्यामुळे त्याने सदरची रक्कम पाठवली नाही. त्यानंतर देखील टोपासिंग हा यासीरकडे पैशांची मागणी करु लागल्यानंतर आपली फसवणुक होत असल्याचे त्याच्या लक्षात आले. त्यानंतर खारघर पोलीस ठाण्यात याबाबत तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा दाखल करुन या प्रकरणाच्या तपासाला सुरुवात केली आहे.

# फणसवाडी येथील तरुणांनी दाखवली भूतदया पशुपक्षांसाठी जंगलात केली पाण्याची व्यवस्था



**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सध्या उष्म्याची काहिली आहे. वाढत्या उष्णतेमुळे पशुपक्ष्यांची पाण्यासाठी जंगलात वाताहात होतांना दिसत आहे. तसेच पाण्याअभावी अनेक पक्षी मृत्यू पावल्याचे सुधागड तालुक्यातील फणसवाडी येथील तरुणांना लक्षात आले. त्यामुळे या तरुणांनी पशुपक्षांसाठी जंगलात झाडांवर पिण्याच्या पाण्यासाठी व्यवस्था केली आहे.

फणसवाडी येथील निखिल शिंगरे, राकेश शिंगरे व रोशन शिंदे या तरुणांनी पाण्याची भांडी झाडावर लावून हा अनोखा उपक्रम राबविला आहे. हे तरुण पशुपक्ष्यांसाठी गावात व गावाशेजारील जंगलात ठिकठिकाणी जाऊन पाण्याची भांडी झाडाला बांधून त्यामध्ये रोज पाणी ठेवत आहेत. जंगलातील जलसाठे कोरडे पडल्यावर पशुपक्ष्यांना हे पाणी संजीवनी ठरत आहे. चिमणी, कावळे व इतर अनेक पक्षी दाण्यापाण्यासाठी येतात व हे पाणी पितात आणि तेथे पाण्यात छान डुंबतात देखील. या उपक्रमाचे सर्व स्थरातून कौतुक होत आहे.